# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक प्रक्रीया घोषणा/802/२०१४
दिनांक :१८/११/२०१४

**वाचावे :**

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४
३. इकडील जा.क्र.रासनिप्रा/निवडणुक प्रक्रीया घोषणा/६१४/२०१४ दि.३०/१०/२०१४

**विषय : निवडणुक प्रक्रीया सुरु करणेबाबत**

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब चे तरतुदी अन्वये, सहकारी संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्यासाठी व त्यासाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण, निर्देशन व नियंत्रण हे राज्य शासनाने गठीत केलेल्या " राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास " अधिकार प्राप्त आहेत,

ज्या अर्थी, राज्य शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी उक्त अधिनियमान्वये तयार केलेले व दि.११/९/२०१४ रोजी अधिसुचीत केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ हे अंमलात आले आहेत,

ज्या अर्थी, उक्त नमुद नियमान्वये राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तालुका सहकारी निवडणुक अधिकारी नेमणुकीचे आदेश निर्गमित केलेले आहेत,

ज्याअर्थी, दि.१.४.१३ ते ३१.१०.२०१४ या कालावधीत (दोन्ही दिनांक धरुन) ज्या सहकारी संस्थांचे निवडणुकीसाठी प्राथमिक मतदार यादीचा अर्हता दिनांक निश्चित करण्याचे आदेश राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने पारीत केलेले आहेत,

ज्याअर्थी, उक्त नमुद निवडणुक नियमातील तरतुदीअन्वये सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी आवश्यक ते इतर सर्व आदेश/ परीपत्रके/ मार्गदर्शक सुचना राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणाने निर्गमित केलेले आहेत,

ज्याअर्थी वाचावे क्र.३ अन्वये दि.३१/३/२०१३ रोजी अथवा त्यापुर्वी समितीची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रीया सुरु करणेचे आदेश निर्गमित केलेले आहे. आता दि.१.४.१३ ते ३१.१०.२०१४ या कालावधीत (दोन्ही दिनांक धरुन) समितीची मुदत संपलेल्या सहकारी संस्थांचीही निवडणुक प्रक्रीया सुरु करणे आवश्यक आहे,

त्याअर्थी उक्त नमुद मुदत संपलेल्या सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहेत.

**आदेश**

राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब, महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे नियम ३ (v) व राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास समर्थ करण्याऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन दि.१.४.१३ ते ३१.१०.२०१४ या कालावधीत (दोन्ही दिनांक धरुन) समितीची मुदत संपलेल्या व प्राथमिक मतदार यादीचा अर्हता दिनांक घोषीत केलेल्या सहकारी संस्थांची निवडणुक प्रक्रीया जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांनी तात्काळ प्रभावाने सुरु करावी. सदर निवडणुका महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ चे तरतुदीचे अनुपालन करुन घेणेत याव्यात. याबाबतचा अनुपालन अहवाल वेळोवेळी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणास देण्यात यावा.

**(डॉ. आनंद जोगदंड)** 15/11/14
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. तालुका / वार्ड सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व).

**प्रत माहितीस्तव** - विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत सस्नेह रवाना** :- १.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. संचालक, हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपुर
४. आयुक्त (दुग्ध विकास), महाराष्ट्र राज्य, अब्दुल गफार खान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई
५. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे